# ‘मुंबईत जाऊन मरेन, पण शरण येणार नाही’; जरांगे पाटलांचा सरकारला इशारा



सोमवार दि. १४ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक १४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

## बावनकुळे, शिंदे-फडणवीसांवर गंभीर आरोप; १५ सप्टेंबरला अंतरवाली सराटीतून मुंबईकडे कूच, १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानावर उपोषणाचा निर्धार

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या सोळाव्या दिवशी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप करत, सरकारकडून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा त्यांनी केला. ‘चौकशांना घाबरून किंवा सरकारसमोर शरण जाऊन आंदोलन थांबवणार नाही. मुंबईत जाऊन मरेन, पण सरकारसमोर गुडघे टेकणार नाही,’ असा आक्रमक इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी १५ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने कूच करण्याचा आणि १९ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करण्याचा निर्धार त्यांनी पुन्हा व्यक्त केला. सरकारकडे मागण्या मान्य करण्यासाठी अद्याप आठ दिवसांचा कालावधी असल्याचे सांगत, त्यानंतर मुंबईतील आंदोलन अटळ असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

चौकशांच्या माध्यमातून दबाव आणल्याचा आरोप आंदोलन सुरू असतानाच आपल्या निकटवर्तीय सहकाऱ्यांच्या चौकशा सुरू करण्यात आल्याचा मुद्दा जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या व्यक्तींवर विविध प्रकारे चौकशीचा दबाव आणला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. महसूल विभागातील अधिकारी शनिवार-रविवारच्या सुट्टीच्या दिवशीही काम करीत असल्याचा दावा करत, या चौकशा नैसर्गिक प्रक्रियेचा भाग नसून आंदोलनावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले. ‘कितीही चौकशा केल्या, कितीही दबाव आणला तरी आंदोलन थांबणार नाही. बावनकुळे यांनी सावध राहावे,’ असा थेट इशाराही त्यांनी दिला.

सरकारकडून आंदोलनापासून आपल्याला दूर करण्यासाठी विविध माध्यमातून दबाव आणला जात असल्याचा आरोप करत जरांगे म्हणाले की, चौकशी किंवा कारवाईच्या भीतीने आपण मागे हटणार नाही. मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत आंदोलन सुरूच राहील, अशी भूमिका त्यांनी मांडली.

‘गोळ्या घालण्याचा कट’ असल्याचा दावा यावेळी जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही गंभीर आरोप केले. मुंबईतील आंदोलनादरम्यान आपल्यावर गोळीबार करण्याचा कट रचला जात असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, या आरोपांच्या समर्थनार्थ त्यांनी कोणताही ठोस पुरावा सार्वजनिक केला नाही.

या आरोपांचा उल्लेख करताना जरांगे भावुक झाले. ‘मला काही झाले तरी मराठा समाजाने एकत्र राहावे,’ असे आवाहन त्यांनी आंदोलक आणि समाजबांधवांना केले. त्यामुळे आंदोलनाच्या पुढील टप्प्यात त्यांच्या सुरक्षेचा आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्नही महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. आझाद मैदानाच्या परवानगीवरून सरकारला लक्ष्य मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करण्यासाठी परवानगी नाकारण्यात आल्याच्या मुद्द्यावरही जरांगे पाटील यांनी सरकारवर निशाणा साधला. परवानगी नाकारण्यामागे द्वेषभावना असल्याचा आरोप त्यांनी केला. ‘आम्ही संविधानाच्या मार्गाने आंदोलन करणार आहोत. संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार शांततामय मार्गाने आंदोलन करण्यापासून आम्हाला कोणीही रोखू शकत नाही,’ अशी भूमिका त्यांनी मांडली. पाणी आणि औषधोपचार बंद करण्यास भाग पाडले तर उपचारही स्वीकारणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला. त्यामुळे मुंबईतील प्रस्तावित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि आंदोलक यांच्यातील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हैदराबाद गॅझेटसह विविध मागण्यांवर ठाम मराठा समाजाला आरक्षण देताना हैदराबाद गॅझेट, सातारा व कोल्हापूर गॅझेटमधील नोंदी आणि कुणबी नोंदींच्या आधारे प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया राबवावी, अशी मागणी जरांगे यांनी केली. याशिवाय रद्द करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांचा प्रश्नही तातडीने सोडवावा, अशी मागणी त्यांनी केली.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडेही सरकारने गांभीर्याने पाहावे, अशी भूमिका त्यांनी मांडली. एमपीएससी, ईडब्ल्यूएस आणि एसबीसी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्या सरकारने मान्य कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली.

‘सरकारकडे आणखी आठ दिवस’

सरकारला अंतिम संधी देत असल्याचे सांगताना जरांगे पाटील म्हणाले की, ‘सरकारकडे अजून आठ दिवस आहेत. या काळात मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्या तर मुंबईला जाण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. मात्र मागण्या मान्य झाल्या नाहीत तर मुंबईतील आंदोलन अटळ आहे.’

त्यामुळे पुढील (पान २ वर)

## भरती परीक्षा पद्धतीत सुधारणांसाठी जालना जिल्ह्यातून सूचना मागविल्या
### विद्यार्थी, परीक्षार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा सुचविण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर विभागातील जालना जिल्ह्यातून सूचना, शिफारशी, हरकती व अभिप्राय मागविण्यात आले आहेत. विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्याबरोबरच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या कार्यकक्षेनुसार राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी आणि संबंधित हितधारकांशी चर्चा करून परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी सूचना व अभिप्राय संकलित करण्यात येणार आहेत. या अनुषंगाने उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष व सदस्य २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्मार्ट सिटी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे भेट देणार आहेत. त्यापूर्वी जालना जिल्ह्यातील संबंधित घटकांकडून सूचना व अभिप्राय संकलित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष ९ सप्टेंबरपासून १८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत कार्यरत राहणार आहे. विद्यमान परीक्षा प्रणाली व कार्यपद्धतीचा आढावा, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता व सुरक्षितता, प्रश्नपत्रिका निर्मितीपासून निकालापर्यंतची प्रक्रिया, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, बायोमेट्रिक प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, ऑडिट ट्रेल्स व सीसीटीव्ही देखरेख, पेपरफुटी व अन्य गैरप्रकारांना प्रतिबंध, तोतया उमेदवार व इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा गैरवापर रोखण्यासाठीच्या उपाययोजना याबाबत सूचना अपेक्षित आहेत. याशिवाय इतर राज्ये किंवा देशांतील आधुनिक व सुरक्षित परीक्षा प्रणालीतील उत्कृष्ट (पान २ वर)

चॉकलेटचे आमिष दाखवुन चिमुकलीवरील अत्याचार; ६० वर्षीय संशयित पोलिसांच्या ताब्यात

## आरोपी आमच्या ताब्यात द्या, आम्ही त्याचा बंदोबस्त करू

### आमच्यावर गुन्हे दाखल करायचे असतील तर करा गोरंट्याल यांचा संतप्त इशारा..

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील रामनगर परिसरात दिनकर कॉलनीत अवघ्या सहा वर्षांच्या चिमुकलीला चॉकलेटचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न झाल्याच्या धक्कादायक घटनेने जालन्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील ६० वर्षीय आरोपी दिनेश सुवर्णकर याला सदर बाजार पोलिसांनी ताब्यात घेतले असून, आरोपीला कठोरात कठोर शिक्षा, प्रसंगी फाशीची शिक्षा देण्याची मागणी करत



माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी समर्थकांसह सदर बाजार पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. चिमुकलीवर अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर येताच नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला. या घटनेतील आरोपीवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, तसेच प्रकरण कोणत्याही दबावाखाली दडपले जाऊ नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी कैलास गोरंट्याल यांनी आक्रमक भूमिका घेत, ‘‘सदरील आरोपीला आमच्या ताब्यात द्या, त्याचा आम्ही योग्य बंदोबस्त करू. त्यानंतर आमच्यावर जे काही गुन्हे दाखल (पान २ वर)

## डीजेचा दणदणाट की संस्कृतीचा निनाद?
### गणेशोत्सवाच्या स्वागताची आज खरी परीक्षा

**जालना । प्रतिनिधी**

‘मूर्तीची उंची वाढू द्या; पण त्याहून अधिक विचारांची उंची वाढू द्या. डीजेचा आवाज कमी होऊ द्या; पण संस्कारांचा आवाज बुलंद होऊ द्या. भव्यतेची स्पर्धा नको; सामाजिक बांधिलकीची स्पर्धा हवी. गणरायाचा उत्सव केवळ जल्लोषाचा नव्हे, तर समाजपरिवर्तनाचा उत्सव बनू द्या!’



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यंदा हा संदेश केवळ घोषवाक्यापुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची गरज निर्माण झाली आहे. गणरायाचे आगमन होत असताना शहरातील रस्त्यांवर ढोल-ताशांचा निनाद होणार की कानठळ्या बसविणारा डीजेचा दणदणाट, हा प्रश्न यंदाच्या उत्सवाच्या स्वरूपावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. उत्सव साजरा करताना आनंद, उत्साह आणि भक्ती यांसोबतच संस्कृती, पर्यावरण, सामाजिक बांधिलकी आणि कायद्याचे भान राखले जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाची स्वतः ची समृद्ध परंपरा आहे. ढोल-ताशे, लेझीम, तुतारी, हलगी, झांज, मृदंग यांसारख्या पारंपरिक वाद्यांमधून केवळ आवाज निर्माण होत नाही, तर त्यातून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा निनाद ऐकू येतो. त्यामुळे डीजेच्या वाढत्या वापरामुळे या पारंपरिक वाद्यांची जागा संकुचित होऊ नये, ही अपेक्षा व्यक्त होत आहे. विशेषतः तरुणाईने पारंपरिक वाद्यांच्या पथकांकडे वळल्यास गणेशोत्सवाला सांस्कृतिक वैभवाची नवी दिशा मिळू शकते. डीजेच्या मोठ्या आवाजापेक्षा शिस्तबद्ध ढोल-ताशा पथक, लेझीमची लय आणि तुतारीचा निनाद हा उत्सवाच्या वातावरणाला वेगळेच सौंदर्य देऊ शकतो.

गणेशोत्सवात दरवर्षी मोठ्या मूर्ती, आकर्षक मंडप, रोषणाई आणि सजावटीची स्पर्धा पाहायला मिळते. या स्पर्धेला सामाजिक उपक्रमांची जोड मिळणे आवश्यक आहे. मंडळांनी ‘आपला मंडप किती भव्य?’ यापेक्षा ‘आपले सामाजिक योगदान किती मोठे?’ याची स्पर्धा करावी, अशी अपेक्षा आहे. एका मंडळाने रक्तदान शिबिर आयोजित करावे, दुसऱ्याने विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन करावे, तिसऱ्याने वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची जबाबदारी घ्यावी, तर अन्य मंडळाने व्यसनमुक्ती किंवा स्वच्छता अभियान राबवावे. अशा उपक्रमांतून गणेशोत्सवाची सामाजिक ताकद अधिक प्रभावीपणे समोर येऊ शकते. यंदाच्या उत्सवात प्रत्येक गणेश मंडळाने किमान एक सामाजिक संकल्प स्वीकारण्याची गरज आहे. ‘एक मंडळएक सामाजिक संकल्प’ ही संकल्पना प्रत्यक्षात आली, तर उत्सव संपल्यानंतरही त्या उपक्रमाचा समाजाला लाभ मिळू शकतो. ‘एक गणेश मंडळशंभर झाडे’, ‘एक गणेशभक्तएक झाड’, ‘एक मंडळएक व्यसनमुक्ती अभियान’, ‘एक मंडळविद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन’ अशा संकल्पना राबविता येऊ शकतात. केवळ वृक्षारोपणाचा फोटो काढून थांबण्याऐवजी लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याची जबाबदारीही मंडळांनी स्वीकारणे आवश्यक आहे. (पान २ वर)

## श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त वनदेव मंदिरात प्रवेशद्वाराचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील श्री चक्रधर स्वामी यांच्या चरणांकित स्थानाने पावन झालेल्या वनदेव मंदिर परिसरात श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त प्रस्तावित प्रवेशद्वाराचे भूमिपूजन आज उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात पार पडले. शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते या प्रवेशद्वाराच्या कामाचा विधिवत शुभारंभ




करण्यात आला. श्री चक्रधर स्वामी अवतार दिनाचे औचित्य साधून वनदेव मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्रोच्चार व विधिवत पूजा-अर्चा करून प्रस्तावित प्रवेशद्वाराचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित भाविकांनी श्री चक्रधर स्वामींचे दर्शन घेतले. त्यामुळे संपूर्ण मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण (पान २ वर)

## १४ दुकाने सील, उघड्यावर मांसविक्री करणाऱ्यांचे साहित्य जप्त
### *आयुक्त अंजली शर्मा यांच्या आदेशानंतर स्वच्छता विभागाची कारवाई*

**जालना । प्रतिनिधी**

शहरातील स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य आणि नियमबाह्य मांसविक्रीला आळा घालण्यासाठी जालना महापालिका प्रशासनाने रविवारी, १३ सप्टेंबर रोजी चंदनझिरा परिसरात धडक कारवाई केली. या कारवाईत नियमांचे उल्लंघन करणारी १४ दुकाने सील करण्यात आली, तर उघड्यावर मांसविक्री करणाऱ्यांवरही कारवाई करून विक्रीसाठी ठेवण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले. ही कारवाई महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता निर्माण करणे, उघड्यावर मांसविक्री करणे तसेच महापालिकेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. चंदनझिरा परिसरात काही ठिकाणी उघड्यावर मांसविक्री



केली जात असल्याची बाब महापालिका प्रशासनाच्या निदर्शनास आली होती. उघड्यावर मांसविक्रीमुळे परिसरातील स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होण्याबरोबरच दुर्गंधी, कचरा आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या पथकाने परिसराची पाहणी करून नियमबाह्य पद्धतीने व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई केली. उघड्यावर मांसविक्री करणाऱ्यांचे साहित्य जप्त करण्यात आले. तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या दुकानांवर सीलची कारवाई करण्यात आली.

चंदनझिरा येथील कारवाईदरम्यान एकूण १४ दुकाने सील करण्यात आली. संबंधित दुकानदारांकडून नियमांचे पालन होत आहे की नाही (पान २ वर)

# संपादकीय...

## प्लास्टिक फुलांचा बाजार की शेतकऱ्यांच्या घामाची राख?

फुलांचा सुगंध माणसाला आनंद देतो; पण आज बाजारपेठेत फुलांच्या नावाखाली प्लास्टिकचा पसारा वाढत आहे. गणेशोत्सव, महालक्ष्मी उत्सव आणि आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा सजत असताना एका बाजूला शेतकरी आपल्या शेतात नैसर्गिक फुले पिकवण्यासाठी पैसा, पाणी, मजुरी आणि श्रम खर्च करीत आहे, तर दुसऱ्या बाजूला वर्षानुवर्षे टिकणाऱ्या प्लास्टिक फुलांचा बाजार त्याच्या कष्टाच्या उत्पादनाला थेट स्पर्धा देत आहे. हा केवळ व्यापाराचा प्रश्न नाही; हा शेतकऱ्याच्या श्रमाच्या मूल्याचा, पर्यावरणाचा आणि प्रशासनाच्या अंमलबजावणीच्या इच्छाशक्तीचा प्रश्न आहे. नैसर्गिक फूल पिकविण्यासाठी शेतकऱ्याला आधी जमीन तयार करावी लागते. लागवड, बियाणे किंवा रोपे, खत, औषधोपचार, पाणी, मजुरी, वाहतूक आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्याचा खर्च करावा लागतो. फुलांचे आयुष्य कमी असल्याने त्यात आणखी एक मोठा धोका असतोमाल विकला नाही तर तो दुसऱ्या दिवशी कचरा ठरतो. प्लास्टिक फुलांना मात्र ही अडचण नाही. ती वर्षभर दुकानात ठेवता येतात, खराब होत नाहीत आणि पुन्हा-पुन्हा विकता येतात. परिणामी ग्राहकांसमोर स्वस्त आणि टिकाऊ पर्याय उभा राहतो; पण त्या 'स्वस्ताई'ची खरी किंमत कोण मोजतो? उत्तर स्पष्ट आहेनैसर्गिक फुल उत्पादक शेतकरी आणि पर्यावरण! सर्वात गंभीर प्रश्न प्रशासनाच्या भूमिकेचा आहे. प्लास्टिक फुलांच्या साठवणुकीवर, व्यापारावर आणि विक्रीवर निर्बंध असतील, तर बाजारपेठेत त्यांचा खुलेआम साठा कसा दिसतो? दुकाने, गोदामे आणि बाजारपेठांमध्ये तपासणी कोण करणार? कारवाईचे अधिकार असलेली यंत्रणा प्रत्यक्षात किती वेळा बाजारात उतरते? जप्ती झाली तर पुढील कारवाई काय होते? कागदावर निर्बंध आणि प्रत्यक्ष बाजारात मोकळा व्यापारहा विरोधाभास संपला पाहिजे. नियम बनविणे सोपे आहे; त्यांची अंमलबजावणी करणे ही खरी प्रशासनाची परीक्षा आहे. सण जवळ आल्यानंतर एखाद-दोन दुकानांवर प्रतीकात्मक कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. साठवणूक करणारे, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते आणि पुरवठा साखळी यांची तपासणी करण्याची गरज आहे. आज नैसर्गिक फुल उत्पादकाचा माल बाजारात येतो, तेव्हा त्याला दर मिळणे आवश्यक आहे. मात्र कृत्रिम पर्याय मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्यास मागणीवर परिणाम होतो. मागणी कमी झाली की दर घसरतो आणि दर घसरला की शेतकऱ्याचा उत्पादन खर्चही निघत नाही. शेतकरी फुलशेतीकडे वळतो कारण बाजारपेठ आहे, अशी त्याची अपेक्षा असते. पण जर त्याच बाजारपेठेत त्याच्या उत्पादनाची जागा कृत्रिम वस्तूंनी घेतली आणि प्रशासनाने त्याकडे डोळेझाक केली, तर शेतकऱ्याने पुन्हा शेतीत गुंतवणूक का करावी? शेतकऱ्याच्या घामाला बाजारपेठेत प्राधान्य नसेल, तर 'शेतकरीहित' हा शब्द केवळ भाषणापुरता उरतो. प्लास्टिकचा प्रश्न केवळ सौंदर्य किंवा व्यापारापुरता मर्यादित नाही. प्लास्टिक वस्तूंचा वापर, त्यांची विल्हेवाट आणि त्यातून निर्माण होणारा कचरा हा व्यापक पर्यावरणीय प्रश्न आहे. नैसर्गिक फुलांचा वापर झाल्यानंतर त्यांचे जैविक पद्धतीने व्यवस्थापन करता येते; मात्र कृत्रिम प्लास्टिक सजावटीच्या वस्तूंच्या विल्हेवाटीचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा आहे. एकीकडे प्रशासन 'प्लास्टिकमुक्त' अभियानांची घोषणा करते आणि दुसरीकडे सणांच्या काळात प्लास्टिकच्या सजावटीच्या वस्तूंचा बाजार फोफावत असेल, तर या विरोधाभासाचा जाब विचारायलाच हवा. गणेशोत्सव आणि महालक्ष्मी उत्सव हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाचे सण आहेत. या काळात फुले, हार, सजावटीचे साहित्य आणि पूजासाहित्याला मोठी मागणी असते. म्हणजेच नैसर्गिक फुल उत्पादकांसाठी हा महत्त्वाचा बाजारपेठीय काळ आहे. म्हणूनच प्रशासनाने सण सुरू होण्याची वाट पाहण्यापेक्षा आतापासूनच बाजारपेठांची तपासणी केली पाहिजे. दुकाने, गोदामे, घाऊक बाजार आणि संशयित साठवणूक केंद्रांची तपासणी झाली पाहिजे. नियमभंग आढळल्यास केवळ माल जप्त करून विषय संपवू नये; लागू नियमांनुसार प्रभावी कारवाई झाली पाहिजे. प्रशासनावर प्रश्न उपस्थित करणे आवश्यक आहे; पण ग्राहकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. आपण सण साजरा करताना कोणते फूल वापरतो, कोणती सजावट करतो आणि आपल्या खरेदीमुळे कोणत्या अर्थव्यवस्थेला बळ मिळते, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. खऱ्या फुलांचा सुगंध निवडणे म्हणजे केवळ पूजा नव्हे; तो शेतकऱ्याच्या श्रमाचा सन्मान आहे. गणरायाच्या चरणी अर्पण होणाऱ्या फुलामागे एखाद्या शेतकऱ्याची मेहनत असते. त्या फुलाला बाजारपेठ मिळावी, योग्य दर मिळावा आणि त्याचा उत्पादक टिकून राहावा, ही समाजाचीही जबाबदारी आहे. फुल उत्पादक शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे निवेदन देणे ही बाब केवळ तक्रार म्हणून पाहता कामा नये. या निवेदनामागे बाजारपेठेतील बदलाचे संकेत आहेत. प्रशासनाने संबंधित विभागांची संयुक्त तपासणी मोहीम राबवावी, प्लास्टिक फुलांच्या साठवणुकीची माहिती घ्यावी, नियमभंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी आणि कारवाईचा पारदर्शक अहवाल सार्वजनिक करावा. त्याचबरोबर नैसर्गिक फुलांच्या विक्रीसाठी स्थानिक बाजारपेठेत स्वतंत्र व्यवस्था, शेतकरी बाजार, थेट ग्राहक विक्री आणि सणांच्या काळात उत्पादकांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना यांचाही विचार झाला पाहिजे. आज फुल उत्पादक शेतकरी निवेदन देत आहेत. उद्या हाच प्रश्न रस्त्यावर आला, तर त्याला केवळ आंदोलन म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. कारण त्यामागे उत्पादन खर्च, बाजारपेठ, पर्यावरण आणि उपजीविकेचा प्रश्न आहे.

प्लास्टिक फुलांची सर्रास विक्री थांबविण्याची मागणी ही केवळ व्यापाऱ्यांविरोधातील भूमिका नाही; ती नैसर्गिक फुलशेती वाचविण्याची मागणी आहे. प्रशासनाने आता ठरवायचे आहेसणांच्या बाजारपेठेत शेतकऱ्याच्या शेतातील फुलांना जागा मिळणार की प्लास्टिकच्या फुलांना ? कारवाई कागदावर होणार की बाजारात?शेतकऱ्याचा घाम जिंकणार की प्लास्टिकचा स्वस्त बाजार? उद्रेक होण्याची वाट पाहण्यापेक्षा प्रशासनाने आजच जागे व्हावे. कारण शेतकऱ्याच्या शेतातील फूल कोमेजण्याआधी त्याच्या आशा कोमेजू नयेत, एवढीच अपेक्षा!

## पान १ व ४ वरुन...

### मुंबईत जाऊन...

काही दिवस सरकार आणि मराठा आंदोलक यांच्यातील चर्चेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. एकीकडे सरकारकडून आंदोलन शांततेत हाताळण्याचे प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे जरांगे पाटील यांनी मुंबईकडे कूच करण्याचा निर्धार कायम ठेवला आहे. मुंबईकडे जाणाऱ्या आंदोलनाची तयारी १५ सप्टेंबरला अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे कूच आणि १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानावर उपोषण, अशी आंदोलनाची रूपरेषा जरांगे यांनी जाहीर केली आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या या आंदोलनासाठी राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने कार्यकर्ते मुंबईकडे रवाना होण्याची शक्यता आहे. दरम्यान, सरकारने मागण्यांवर कोणती भूमिका घेतली आणि आंदोलकांशी संवाद साधण्यासाठी कोणती पावले उचलली जातात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. एकीकडे आरक्षणाच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचे आव्हान, तर दुसरीकडे मुंबईतील आंदोलन कायदा-सुव्यवस्थेच्या चौकटीत हाताळण्याचे आव्हान सरकारसमोर उभे ठाकले आहे.

### भरती परीक्षा पद्धतीत...

पद्धतींचा अभ्यास, परीक्षा केंद्रांसाठी किमान मानके, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस यंत्रणा, शिक्षण विभाग व परीक्षा संस्थांमधील प्रभावी समन्वय तसेच उमेदवारांसाठी जलद व पारदर्शक तक्रार निवारण व्यवस्था याबाबतही नागरिकांनी आपले अभिप्राय सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**१८ सप्टेंबरपर्यंत अभिप्राय सादर करण्याची मुदत**

सूचना व अभिप्राय निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्याकडे नोडल अधिकाऱ्यामार्फत सादर करता येतील. प्रत्यक्ष अभिप्राय देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील परीक्षा विभागातील विशेष कक्षात संपर्क साधता येईल. प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसलेल्या नागरिकांनी आपले लेखी अभिप्राय -.. या ई-मेलवर १८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत पाठवावेत. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त सर्व सूचना व अभिप्रायांचे संकलन करून ते शासनाच्या उच्चस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहेत. समिती या शिफारशींचा सखोल अभ्यास करून राज्य शासनाला सर्वसमावेशक अंतिम अहवाल सादर करणार आहे. राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा परीक्षार्थींच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या प्रक्रियेत छत्रपती संभाजीनगर विभागातील नागरिक, विद्यार्थी, अभ्यासक आणि संबंधित संस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जालना शशिकांत हदगल यांनी केले आहे.

### डीजेचा दणदणाट...

गणेशोत्सवातील ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न दरवर्षी चर्चेत येतो. मोठ्या आवाजातील डीजेमुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, लहान मुले आणि प्राणी यांना होणारा त्रास हा दुर्लक्षित करता येणार नाही. त्यामुळे उत्सवातील आनंद कायम ठेवत ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवणे ही सामूहिक जबाबदारी आहे. 'डीजे बंदी' हा केवळ प्रशासनाचा आदेश म्हणून पाहण्यापेक्षा त्यामागील सामाजिक हेतू समजून घेण्याची गरज आहे. उत्सवात आवाजाची स्पर्धा नको; संस्कारांची स्पर्धा हवी. कोणत्या मंडळाचा डीजे सर्वाधिक मोठा, यापेक्षा कोणत्या मंडळाने समाजासाठी सर्वाधिक काम केले, याची चर्चा झाली तर गणेशोत्सवाचा खरा हेतू साध्य होईल.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश तरुणांपर्यंत पोहोचविण्याची मोठी संधी मंडळांकडे आहे. गुटखा, तंबाखू, सिगारेट, मद्य आणि अन्य व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केवळ फलकांवर न राहता चर्चासत्रे, व्याख्याने, लघुनाटिका आणि जनजागृती मोहिमांच्या माध्यमातून केले जाऊ शकते. गणरायाला बुद्धी आणि विवेकाचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे गणेशोत्सवातून तरुणाईला विवेकपूर्ण आणि व्यसनमुक्त जीवनाचा संदेश मिळणे अधिक अर्थपूर्ण ठरेल.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांसमोर शिक्षण, करिअर आणि स्पर्धा परीक्षांचे अनेक पर्याय आहेत. मात्र योग्य मार्गदर्शनाअभावी अनेक विद्यार्थी संभ्रमात राहतात. गणेश मंडळांनी या काळात विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, डिजिटल शिक्षण, उच्च शिक्षणाच्या संधी आणि विविध शासकीय योजनांची माहिती देणारे उपक्रम आयोजित करावेत. मंडपात केवळ सजावट आणि मनोरंजनाचे कार्यक्रम न ठेवता एखादा दिवस 'ज्ञानोत्सव' म्हणून साजरा केला, तर गणरायाच्या उत्सवाला नवी दिशा मिळू शकते. गणेशोत्सव हा सामाजिक एकोप्याचा उत्सव बनला पाहिजे. जात, धर्म, पंथ, भाषा आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवून समाजातील सर्व घटकांनी एकत्र येणे हीच महाराष्ट्राच्या उत्सव संस्कृतीची ताकद आहे.

गणरायाच्या मंडपातून 'सर्वधर्म समभाव', सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला गेला, तर उत्सवाची व्याप्ती धार्मिक कार्यक्रमापलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकीच्या पातळीवर पोहोचेल. उत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. प्लास्टिकचा वापर, निर्माल्य, थर्माकोल आणि अन्य सजावटीचे साहित्य यामुळे पर्यावरणावर परिणाम होतो. त्यामुळे मंडळांनी निर्माल्य संकलन, कचरा वर्गीकरण, प्लास्टिकमुक्त मंडप आणि स्वच्छता अभियान यावर भर देणे गरजेचे आहे.

'माझा मंडपमाझी स्वच्छता' ही भूमिका प्रत्येक मंडळाने स्वीकारली, तर महापालिका प्रशासनावरील ताण कमी होण्यासोबतच नागरिकांमध्येही स्वच्छतेची सवय निर्माण होऊ शकते. गणरायाच्या आगमनाची मिरवणूक हीच यंदाच्या उत्सवाची पहिली मोठी परीक्षा ठरणार आहे. प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन होते का? डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य दिले जाते का? मिरवणुकीत शिस्त आणि संयम राखला जातो का? ध्वनिप्रदूषण टाळले जाते का? या प्रश्नांची उत्तरे आज प्रत्यक्ष रस्त्यावर मिळणार आहेत.

गणेशोत्सवाचा उत्साह कमी करण्याचा प्रश्न नाही; उलट तो अधिक अर्थपूर्ण करण्याचा प्रश्न आहे. जल्लोष असावा, पण त्याला शिस्तीची जोड असावी. भक्ती असावी, पण त्यासोबत सामाजिक जाणीवही असावी. भव्यता असावी, पण त्यापेक्षा विचारांची उंची अधिक असावी. यंदाचा गणेशोत्सव कोणत्या दिशेने जाणार, हे केवळ प्रशासन ठरवणार नाही. गणेश मंडळे, कार्यकर्ते, तरुणाई आणि नागरिक यांच्या सामूहिक भूमिकेवर उत्सवाचे स्वरूप अवलंबून आहे. डीजेचा दणदणाट की संस्कृतीचा निनाद? भव्य रोषणाई की सामाजिक बांधिलकी? मोठी मूर्ती की मोठा विचार? जल्लोष की जनजागृती? या प्रश्नांची उत्तरे यंदाच्या गणेशोत्सवातून मिळाली पाहिजेत. मूर्तीची उंची वाढू द्या; पण त्याहून अधिक विचारांची उंची वाढू द्या. डीजेचा आवाज कमी होऊ द्या; पण संस्कारांचा आवाज बुलंद होऊ द्या. गणरायाचा उत्सव केवळ जल्लोषाचा न राहता समाजपरिवर्तनाचा उत्सव बनू द्या!

### आरोपी आमच्या...

करायचे असतील ते खुशाल करा,'' असा संतप्त इशारा दिला.

'प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाला का? माध्यमांशी बोलताना गोरंट्याल यांनी गंभीर आरोप केले. आरोपीच्या कुटुंबीयांकडून पीडित मुलीच्या नातेवाईकांना पैशांचे आमिष दाखवून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला. आरोपीचा मुलगा एका शाळेत चपराशी म्हणून काम करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच, आरोपीने दोन-तीन महिन्यांपूर्वी पीडित मुलीच्या आईकडेही शारीरिक सुखाची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भातही तक्रार दाखल करणार असल्याचे गोरंट्याल यांनी स्पष्ट केले. 'यापूर्वीही महिलांसोबत गैरप्रकार?'

आरोपीने यापूर्वीही काही महिलांसोबत छेडछाड अथवा अन्य गैरप्रकार केल्याचा दावा गोरंट्याल यांनी केला. त्यामुळे अशा प्रकारचा त्रास सहन केलेल्या महिलांनी पुढे येऊन पोलिसांत तक्रार दाखल करावी, असे आवाहन त्यांनी केले. तक्रारदार महिलांची ओळख गोपनीय ठेवण्याची मागणीही त्यांनी केली.

पोलिसांकडून गुन्हा दाखल

दरम्यान, सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी दिलेल्या माहितीनुसार, सहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवून ६० वर्षीय इसमाने अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार रात्री दाखल झाली. तक्रारीच्या आधारे आरोपीविरुद्ध संबंधित कायदेशीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे. यापूर्वीही अशाच प्रकारच्या घटना कोणासोबत घडल्या असतील, तर संबंधितांनी कोणतीही भीती न बाळगता पोलिसांशी संपर्क साधून तक्रार दाखल करावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी केले आहे. चिमुकलीवरील अत्याचाराचा प्रयत्न हा समाजाच्या संवेदनशीलतेला हादरा देणारा प्रकार असून, आरोपीवर कायद्यानुसार कठोरात कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. आता या प्रकरणाच्या तपासात कोणताही दबाव, हस्तक्षेप किंवा प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होऊ नये, याकडे संपूर्ण जालना शहराचे लक्ष लागले आहे.

### १४ दुकाने सील...

दुकानांसाठी आवश्यक परवानग्या आणि स्वच्छतेच्या नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची प्रशासनाकडून पाहणी करण्यात आली. महापालिकेच्या कारवाईमुळे परिसरातील नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेच्या दृष्टीने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर, स्वच्छता विभाग प्रमुख सुधीर डहाळे, चिकन-मटन विभाग प्रमुख मोहम्मद अमजद खान यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या पथकाने ही कारवाई केली. कारवाईच्या पथकात मुकेश गायकवाड, राजेंद्र मिसाळ, रामेश्वर जाधव, प्रभारी मुकादम तुषार लोखंडे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. चंदनझिरा परिसरातील कारवाई ही केवळ एकदिवसीय मोहीम नसून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कारवाई सातत्याने सुरू ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे शहरातील इतर भागांमध्येही अशाच प्रकारे तपासणी आणि कारवाई होण्याची शक्यता आहे.

महापालिका प्रशासनाच्या या भूमिकेमुळे उघड्यावर मांसविक्री करणारे तसेच स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांवर आता कारवाईची टांगती तलवार राहणार आहे. नागरिकांचे आरोग्य, सार्वजनिक स्वच्छता आणि शहरातील नियमबद्ध व्यवसाय व्यवस्था कायम ठेवण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, चंदनझिरा परिसरातील या कारवाईनंतर महापालिकेची पुढील धडक मोहीम कोणत्या भागात होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### श्री चक्रधर स्वामी...

निर्माण झाले होते. वनदेव मंदिर हे श्री चक्रधर स्वामी यांच्या चरणस्पर्शाने पावन झालेले धार्मिक व ऐतिहासिक स्थळ म्हणून महानुभाव पंथीय भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी भाविकांची नियमित वर्दळ असते. मंदिर परिसराच्या विकासाच्या दृष्टीने प्रवेशद्वाराचे काम महत्त्वपूर्ण ठरणार असून, यामुळे मंदिराची भव्यता आणि परिसराच्या सौंदर्यात निश्चितच भर पडणार आहे. यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा विकास करताना त्यांच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त केली. श्री चक्रधर स्वामी यांनी समाजाला दिलेला समतेचा, अध्यात्माचा आणि मानवतेचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा पवित्र स्थळांचे संवर्धन व विकास आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. वनदेव मंदिराच्या प्रस्तावित प्रवेशद्वारामुळे मंदिराची स्वतंत्र ओळख अधिक ठळक होण्यास मदत होणार आहे. मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी हे प्रवेशद्वार आकर्षणाचे केंद्र ठरण्यासोबतच परिसराच्या विकासाला नवी दिशा देणारे ठरेल, अशी भावना यावेळी उपस्थित मान्यवर व भाविकांनी व्यक्त केली. श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाला प.पू. महंत श्री. आकाश बाबाजी कोठी यांच्यासह महानुभाव पंथातील संत-महंत, शिवसेना पदाधिकारी, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, स्थानिक नागरिक तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प.पू. म. आकाश बाबाजी कोठी, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, विनीत सहानी, नगरसेवक श्रीकांत पांगारकर, रवी भुतेकर, नगरसेवक सुनील पांगारकर, अमोल महाजन, पत्रकार गुलाब पाटील, डॉ. बळीराम बागल यांच्यासह परिसरातील भक्तगण व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. अवतार दिनानिमित्त मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला. संत-महंतांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले होते. श्रद्धा, भक्ती आणि धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने जालना शहरातील महानुभाव पंथाच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेला आणखी एक नवी जोड मिळाली.वनदेव मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या भूमिपूजनाने मंदिर परिसराच्या विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले असून, आगामी काळात हे प्रवेशद्वार भाविकांचे स्वागत करणारे आकर्षक प्रवेशद्वार म्हणून उभे राहणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यामुळे महानुभाव पंथीय भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

### अधिस्वीकृती समित्यांच्या...

करण्याचा विषय शासनस्तरावर प्रलंबित असल्याकडेही निवेदनातून लक्ष वेधण्यात आले आहे. त्यामुळे नियमावलीत आवश्यक सुधारणा पूर्ण होण्यापूर्वी नव्या समित्यांची स्थापना किंवा पुनर्रचना करण्याची घाई करू नये, अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

समित्यांची रचना, प्रतिनिधित्व, पात्रता निकष आणि निवड प्रक्रिया याबाबत नियमांमध्ये बदल अपेक्षित असतील, तर प्रथम नियमावली अद्ययावत करावी आणि त्यानंतर नव्या नियमांच्या आधारे समित्यांची निवड करावी, अशी मागणी आहे.

जुन्याच नियमांच्या चौकटीत नव्या समित्या गठित केल्यास भविष्यात पुन्हा प्रतिनिधित्व, पात्रता, रचना किंवा अधिकारक्षेत्राबाबत वाद निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनातून सूचित करण्यात आले आहे. राज्य व विभागीय अधिस्वीकृती समित्यांच्या गठनाशी संबंधित बाबींवर रिट याचिका क्रमांक १००७०/२०२३ मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर प्रलंबित असल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

त्यामुळे पुढील प्रशासकीय निर्णय घेताना संबंधित न्यायालयीन कार्यवाही, उपलब्ध आदेश-निर्देश आणि लागू कायदेशीर चौकट यांचा विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. न्यायालयीन प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या पुढील निर्णयामुळे कोणतीही विसंगती निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याची भूमिका प्रेस कौन्सिलने मांडली आहे.

४ सप्टेंबरच्या मुदतवाढीचा कायदेशीर आधार स्पष्ट करण्यासाठी कायदा व न्याय विभागाचा स्वतंत्र अभिप्राय घेण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

कार्यकाळ संपल्यानंतर समित्यांना मुदतवाढ देण्याचा अधिकार कोणत्या नियमातून प्राप्त होतो, सक्षम प्राधिकाऱ्याला असा निर्णय घेण्याचा अधिकार आहे का आणि संबंधित शासन निर्णय लागू नियम व प्रशासकीय अधिकारांच्या चौकटीत आहे का, याची कायदेशीर तपासणी करावी, असे निवेदनात म्हटले आहे.

नव्या समित्यांच्या गठनासाठी शासनाने स्पष्ट, पारदर्शक, निष्पक्ष, वस्तुनिष्ठ आणि वेळबद्ध प्रक्रिया जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पात्र संघटनांकडून अर्ज मागवून त्यांची कागदपत्रे तपासावीत, पात्रता निकष आधीच जाहीर करावेत आणि प्राप्त अर्जांची समान निकषांवर छाननी करावी.

आवश्यक असल्यास प्राथमिक यादी प्रसिद्ध करून त्यावर हरकती व सूचना मागवाव्यात आणि त्यानंतर अंतिम निर्णय घ्यावा, अशी प्रक्रियाही सुचविण्यात आली आहे. पात्रता किंवा प्रतिनिधित्वाबाबत आक्षेप असल्यास संबंधित संघटनांना स्पष्टीकरण, हरकत किंवा पुनर्विचाराची संधी देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

नव्या समित्यांच्या पुनर्रचनेत प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रच्या प्रतिनिधित्वाचाही लागू नियम आणि पात्रता निकषांच्या आधारे वस्तुनिष्ठ विचार करावा, अशी स्वतंत्र मागणी करण्यात आली आहे. राज्य अधिस्वीकृती समितीत दोन प्रतिनिधी आणि नऊ विभागीय अधिस्वीकृती समित्यांमध्ये प्रत्येकी एक प्रतिनिधी देण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीवरही कोणताही पूर्वग्रह न ठेवता लागू नियम आणि समान निकषांच्या आधारे निर्णय घ्यावा, अशी भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.

प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रने कोणत्याही विशिष्ट पत्रकार किंवा संपादक संघटनेला लक्ष्य करण्याऐवजी सर्व पात्र संघटनांची समान पद्धतीने पडताळणी, समान पात्रता निकष, वैधानिक कागदपत्रांची तपासणी आणि प्रत्यक्ष कार्यरत स्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्याची मागणी केल्याचे निवेदनातून स्पष्ट होते.

त्यामुळे आता ४ सप्टेंबरच्या मुदतवाढीबाबत शासन कायदेशीर पुनर्विचार करते का, नियमावलीतील प्रस्तावित सुधारणा कधी पूर्ण होतात, नव्या पात्र संघटनांना अर्जाची संधी दिली जाते का आणि नव्या समित्यांच्या गठनासाठी पारदर्शक प्रक्रिया स्वीकारली जाते का, याकडे राज्यातील पत्रकारिता क्षेत्राचे लक्ष लागले आहे. अधिस्वीकृती व्यवस्थेतील पारदर्शकता, प्रतिनिधित्व आणि नियमाधारित प्रक्रिया याबाबत शासनाची पुढील भूमिका निर्णायक ठरणार आहे.

### शिवसेनाप्रमुख बाळासाहेब...

९१६७३६४८७०, दिगंबर चव्हाण ७७१५९२४५८८, रवींद्र मालुसरे ९३२३११७७०४ यांच्याशी संपर्क साधवा.

### भगवान श्री...

विचारांचा समाजात प्रसार व्हावा आणि नव्या पिढीला महानुभाव पंथाच्या आध्यात्मिक परंपरेची ओळख व्हावी, यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी सांगण्यात आले. लीळाचरित्र या प्राचीन ग्रंथामध्ये भगवान श्री चक्रधर स्वामी यांच्या लीळा आणि कार्याचे वर्णन आढळते. त्यांच्या विचारांचे स्मरण करत अवतार दिनानिमित्त विविध धार्मिक उपक्रम, नामस्मरण आणि भक्तीपर कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी उपस्थित भाविक आणि महानुभाव पंथाच्या अनुयायांनी भगवान श्री चक्रधर स्वामींना अभिवादन केले. एकूणच, भक्तीभाव, नामस्मरण आणि आध्यात्मिक वातावरणात भगवान श्री चक्रधर स्वामी अवतार दिन सोहळा उत्साहात पार पडला.

### विकसित मराठवाड्यासाठी...

समान महत्त्व द्यावे. कनिष्ठ कर्मचाऱ्यांनी मांडलेल्या चांगल्या सूचनांकडे दुर्लक्ष करू नये. 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या 'मंथन शिबिरात' कर्मचाऱ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांवर चर्चा करण्यात येईल. उपयुक्त कल्पना इतर विभागांमध्येही राबविण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्पर्धा परीक्षांच्या पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्यासाठी नवीन कर्मचाऱ्यांकडून सूचना मागवाव्यात. अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती व कार्यपद्धतीतील अडचणींबाबतच्या सूचना लेखी स्वरूपात किंवा ई-मेलद्वारे सादर कराव्यात. या सूचनांची प्राथमिक छाननी करून त्या २१ सप्टेंबर रोजी भेट देणाऱ्या समितीसमोर मांडाव्यात. कार्यालयाबाहेर येणाऱ्या शिष्टमंडळे व आंदोलकांकडूनही विधायक सूचना घेऊन त्यांचा विचार करावा, असे त्यांनी सांगितले.

मराठवाड्यात पावसाचा खंड पडल्याने संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून आवश्यक उपाययोजना कराव्यात. विशेषतः लातूर, धाराशिव, परभणी, जालना व बीड जिल्ह्यांमध्ये परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे व शासनाच्या दुष्काळ निवारणाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. शासकीय कार्यालयांमध्ये स्वच्छता व प्रशासकीय शिस्तीला प्राधान्य द्यावे. प्रत्येक सोमवारी कामाच्या सुरुवातीचा एक तास श्रमदानातून कार्यालय स्वच्छ ठेवावे. कार्यालयात गुटखा खाऊन थुंकण्यास पूर्णपणे प्रतिबंध करावा व स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता सुनिश्चित करावी. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान कार्यालयांची अचानक तपासणी केली जाईल. अस्वच्छता आढळल्यास संबंधित कार्यालय प्रमुखावर पाच हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असे जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले.

### शहरातील डॉ. राजेंद्र...

उंची निश्चित करावी, जेणेकरून वाहतुकीला आणि विजेच्या तारांना कोणताही धोका निर्माण होणार नाही. याची संयुक्त समितीने नोंद घेऊन पुढील वर्षासाठी एक आदर्श व्यवस्थापनाचा केस स्टडी तयार करावा, असेही अ‍ॅड. धन्नावत यांनी म्हटले आहे.

### श्रीगणेशा आरोग्याचा...

येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रम यंदा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा मिळणार आहे. आजारांचे वेळेत निदान होऊन गरज असलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी योग्य ठिकाणी संदर्भित करण्यात येणार आहे. यंदा २० लाखांहून अधिक नागरिकांच्या आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.

**स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार ( ) करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला.

हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

**मराठवाड्यात जागृतीची बीजे**

मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली. १९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

**आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ**

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले. या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

**दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार**

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला. प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो'



चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

**निजामाची आणि भारताची भूमिका**

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला. भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

**भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले**

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता.

भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

**१७ सप्टेंबर : मुक्ती संग्राम दिन**

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्ती संग्राम दिवस' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

**इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा**

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला.

१७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो. मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे. १७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक**
**विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

## जळगाव सपकाळ सार्वजनिक गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**जळगाव सपकाळ - प्रतिनिधी**

३७ वर्षांची 'एक गाव, एक गणपती'ची परंपरा कायम; सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन सामाजिक एकोप्याचा संदेश जळगाव सपकाळ : भोकरदन तालुक्यातील जळगाव सपकाळ येथे गेल्या ३७ वर्षांपासून 'एक गाव, एक गणपती' ही सामाजिक एकोपा आणि बंधुभावाची अनोखी परंपरा अखंडपणे जपली जात आहे. यंदाच्या गणेशोत्सवासाठी सार्वजनिक गणेश मंडळाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, युवकांच्या पुढाकारातून गणेशोत्सव भक्तिमय तसेच सामाजिक सलोखा जपणाऱ्या वातावरणात साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. सार्वजनिक गणेश मंडळ कार्यकारिणी अध्यक्ष : पंजाबराव सपकाळ उपाध्यक्ष : राजू बेलोकर सचिव : कृष्णा सपकाळ कार्याध्यक्ष : अमोल (पप्पूभाऊ) सपकाळ सहसचिव : गणेश दौड जळगाव सपकाळ येथे गावातील हनुमान मंदिराच्या सभामंडपात सार्वजनिक गणेशमूर्तीची स्थापना करण्यात येते. 'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेमुळे गावातील बालगोपाल, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व जाती-धर्मातील नागरिक एकत्र येऊन गणेशोत्सवात सहभागी होतात. त्यामुळे गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता गावाच्या एकजुटीचा, सामाजिक सलोख्याचा आणि बंधुभावाचा उत्सव ठरला आहे. गेल्या ३७ वर्षांपासून कोणताही खंड न पडता ही परंपरा सुरू असून, गावातील युवकांनी ती पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला आहे. गणेशोत्सवाच्या काळात आरती, भजन, कीर्तन, सांस्कृतिक व मनोरंजनाचे विविध कार्यक्रम आयोजित करून गावात भक्तिमय आणि आनंदमय वातावरण निर्माण केले जाते. 'एक गाव, एक गणपती'सोबतच 'एक गाव, एकजूट' हा संदेश देणाऱ्या जळगाव सपकाळच्या सार्वजनिक गणेश मंडळाचा उपक्रम परिसरातील गावांसाठी आदर्श ठरत आहे. यंदाचा गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि सर्वांच्या सहभागातून यशस्वी करण्यासाठी नवनियुक्त कार्यकारिणी व मंडळाचे सर्व सदस्य प्रयत्नशील आहेत.

## मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याच्या प्रयत्नात सरकारने मुख्य समस्या घेऊन येणाऱ्या बडग्यांच्या धारदार आवाजाला बोथट केले!

मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे कार्य सरकारने केले याचे मनापासून स्वागत.परंतु या उत्सवाच्या दरम्यान राज्यातील वर्षभरातील राजकीय-सामाजिक समस्यां, उथलपुथल आणि इतर समस्यांच्या बाबतींत निघणारे बडगे नागपूरकरांसह संपूर्ण महाराष्ट्राचे आकर्षण रहायचे परंतु ते यावर्षी तसे काही दिसले नाही व चर्चेचा विषय सुध्दा बनले नाही त्यामुळे मारबत बढग्यांना घेऊन गेली की काय असे सर्वत्र चित्र दिसत होते.मारबत उत्सव हा नागपूरकरांनसाठी ऐतिहासिक आणि पारंपरिक उत्सव आहे.मारबत उत्सवाची सुरूवात स्वतंत्रपुर्व काळापासून म्हणजे इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले. येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८१ मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला १४५ वर्षे पूर्ण झाले तर पिवळ्या मारबतीला १४२ वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहास आहे.परंतु सरकारने मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याच्या प्रयत्नात बडग्यांना महापालिकेने पायाखाली तुडविल्याचे दिसून आले.कारण यावर्षी मारबत उत्सवातदेश-विदेशातील प्रमुख पाहुणे मंडळी व राज्यातील राजकीय नेते प्रामुख्याने उपस्थित होते. यात परदेशी पाहुण्यांनमध्ये पॅट्रिक लेव्हेरीनो (फ्रान्सचे मुंबईतील कौन्सुल जनरल), मोनिका नागेलगार्ड(नॉर्वेचे मुंबईतील कौन्सुल जनरल),पेट्रा थेमन (फिनलंडच्या हेड ऑफ मिशन आणि कौन्सुल जनरल) आणि क्रीडा क्षेत्रातील उमेश यादव (भारतीय क्रिकेटपटू) व चित्रपट सृष्टीतील जॅकी श्रॉफ(प्रसिद्ध अभिनेते), अंकुश चौधरी,दिग्दर्शक सुभाष घई इत्यादी अनेक मान्यवरांसह अनेक मंत्री व राजकीय पुढारी प्रामुख्याने उपस्थित होते.त्यामुळे मारबत उत्सवात हीच मंडळी आकर्षण बनली व बडग्यांचे आकर्षण आपोआप कमी झाल्याचे दिसून आले.पुर्वी नागपूरमध्ये जेवढे काही बडगे निघायचे त्यांची गुंज (आवाज) संपूर्ण भारतभर जायची व सर्वत्र मोठ्या प्रमाणात चर्चा व्हायची.

कारण यात जनसामान्यांच्या आवाज, समस्या व जनतेचा आक्रोश असलेल्या बडग्या व त्यांचा जल्लोष आणि सत्तेत असलेल्या सरकारला एक चांगला संदेश देऊन जागृत करणे बगडग्यांचे मुख्य उद्दिष्ट रहायचे परंतु यंदा समाज जागृतीची बढग्यांची धारदार तलवार मनपाने बोथट केली व बडग्यापासून मिळणारा जनसामान्यांचा संदेश व आनंद दुरावला.त्यामुळे असे वाटत आहे की, सरकारला समज देणारा बढग्यांचा आवाज सरकारने पुर्णतः दाबला की काय असे चित्र दिसून आले.कारण बडग्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या,दुष्काळ,पेपर फुटीच्या प्रकरणातील गुन्हेगार,रोडचे खड्डे, महिलांवरील अत्याचार, अशोक खरात सारखे प्रकरण, भ्रष्टाचार,घोटाळेबाज, टीईटी घोटाळा, महागाई, बेरोजगारी, एमपीएससी घोटाळा, आरक्षण, एआयमुळे बेरोजगारांवर आलेले संकट व वर्षभर घडलेल्या मुद्दांवर निघालेल्या घटनांवरील जाब विचारण्याची संधी बढग्यांनी गमावली की काय असे चित्र यावर्षी स्पष्ट दिसून आले.उलट पाकिस्तान, दहशतवाद आणि स्मार्ट मीटरविरोधापुरतेच राजकीय- सामाजिक भाष्य अधिक ठळक राहिले.त्यामुळे बडग्यांचा आवाज मनपाने मारबत उत्सवाच्या दरम्यान दाबला की काय असे वाटायला लागले.त्याचप्रमाणे महापालिकेने मारबत उत्सव ग्लोबल करण्यासाठी आणलेल्या व्हिआयपी झगमगाटामुळे बडग्यांचा धारदार आवाज बोथड केला.यावर्षी नागपूरची परंपरा व्हिआयपी झगमगाटात पुर्णपणे हरवली की, काय असे चित्र दिसून आले.मारबत नेहमीप्रमाणे निघाली आणि घेऊन जा गे मारबतच्या आवाजाचा गजरही सर्वत्र झाला,परंतु सत्तेने सरकारला जाब विचारणाऱ्या बढग्यांना धाराशाही करून त्यांचा आवाज बोथट केला.



त्यामुळे नागपूरकरांना शंका आहे की, बढग्यांना मारबत घेऊन गेली की काय! असे वाटायला लागले. मारबत उत्सवाच्या निमित्ताने राज्यातील जनतेच्या समस्या, अडीअडचणी, बेरोजगारीची समस्या, पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या,एमपीएससी पेपर फुटी प्रकरण इत्यादी अनेक समस्यांचा अंबार सरकारपर्यंत पोहचविण्याचे काम बढग्यांच्या माध्यमातून नेहमीच होत होते आणि याची चर्चा नागपूरपासून राज्यभर आणि राज्यापासून देशभर रहात होती.

परंतु या सर्व समस्या राजकीय पुढारी व व्हिआपी लोकांनी संपुष्टात आणल्याचे दिसून आले.नागपूर मारबत उत्सवात बडग्यांचा जल्लोष किंवा आवाज नाही म्हणजे राज्यात काहीच समस्या नसून सर्व काही ठीक आहे अशा पध्दतीचा मारबत उत्सव यावर्षी दिसून आला.त्याचप्रमाणे यावर्षी राजकीय- सामाजिक प्रश्नांवरचा आवाज क्षीण झाल्याचे दिसून आले. मारबत- बडग्याचा हा सोहळा इंग्रजांच्या सत्तेला आव्हान देत सुरू झाला. तेव्हापासुन अन्याय, भ्रष्टाचार, अत्याचार, आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाविरोधात बढग्यांनी नेहमी आवाज उठविला आहे.

परंतू यंदा मात्र वर्षभर गाजलेल्या अनेक राजकीय-सामाजिक प्रश्नांवर अपेक्षित उपरोध दिसला नाही. त्यामुळे घेऊन जा गे मारबतचा गजर झाला खरा, पण बडग्यातून सत्तेला जाब विचारणारा आवाज यावर्षी मात्र क्षीण राहिला हे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

## महाराष्ट्रातील आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंताजनक

आत्महत्या ही केवळ एखाद्या व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित घटना नसून ती कुटुंब, समाज आणि संपूर्ण व्यवस्थेसमोर उभे राहिलेले गंभीर आव्हान आहे. महाराष्ट्रात आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय बनले आहे. विशेषतः तरुण विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये वाढणारी मानसिक अस्वस्थता समाजाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. वृत्तपत्रातील आकडेवारीही या समस्येचे गांभीर्य अधोरेखित करते. त्यामुळे आत्महत्यांकडे केवळ आकडे म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि मानसिक कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात आर्थिक अडचणी, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, कौटुंबिक समस्या, नातेसंबंधांतील ताण, शैक्षणिक दबाव, भविष्यातील अनिश्चितता आणि एकटेपणा यामुळे अनेकांना मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागात शेतीशी संबंधित अडचणी आणि आर्थिक अस्थिरता तर शहरी भागात स्पर्धात्मक जीवनशैली व वाढता मानसिक ताण ही चिंतेची कारणे आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा ताण विशेष चिंताजनक आहे. परीक्षेतील गुण, पालकांच्या अपेक्षा, प्रवेशाची स्पर्धा, करिअरची चिंता आणि मित्रांशी होणारी तुलना यामुळे काही विद्यार्थ्यांवर अनावश्यक मानसिक दबाव निर्माण होतो. मुलांनी प्रत्येक क्षेत्रात अव्वल असलेच पाहिजे, असा आग्रह पालकांनी धरू नये. अपयश हा जीवनाचा शेवट नसून शिकण्याची आणि पुन्हा प्रयत्न करण्याची संधी आहे, हा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आरोग्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. बदलती कुटुंबव्यवस्था, मुलांचे स्थलांतर, एकटेपणा, आरोग्याच्या समस्या आणि सामाजिक संपर्क कमी होणे यामुळे त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. कुटुंबातील सदस्यांनी ज्येष्ठांशी नियमित संवाद साधणे, त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे आणि त्यांच्या भावनांना महत्त्व देणे आवश्यक आहे. आत्महत्या रोखण्यासाठी मानसिक आरोग्याविषयी खुलेपणाने बोलण्याची संस्कृती निर्माण झाली पाहिजे. मानसिक तणाव म्हणजे कमजोरी नसून तोही आरोग्याशी संबंधित प्रश्न आहे, हे समाजाने स्वीकारले पाहिजे.

शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशकांची उपलब्धता वाढवावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनातील बदलांकडे संवेदनशीलतेने पाहावे. पालकांनी केवळ अभ्यास आणि गुणांबाबत विचारपूस न करता मुलांच्या भावनिक स्थितीबद्दलही संवाद साधावा.

सोशल मीडियामुळेही तरुणांमध्ये स्वतःची इतरांशी तुलना करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. इतरांचे यश, आर्थिक स्थिती किंवा जीवनशैली पाहून स्वतःला कमी लेखण्याची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर आणि प्रत्यक्ष माणसांशी संवाद यांचे महत्त्व समजावून सांगणे गरजेचे आहे.

कुटुंबातील संवाद हा या समस्येवरचा सर्वांत महत्त्वाचा आधार ठरू शकतो. एखादी व्यक्ती सतत निराश दिसत असेल, एकटी राहण्याचा प्रयत्न करत असेल किंवा जीवनाबद्दल अत्यंत नकारात्मक बोलत असेल, तर तिची थट्टा किंवा टीका करण्याऐवजी तिचे म्हणणे शांतपणे ऐकले पाहिजे. गरज भासल्यास विश्वासू व्यक्ती, समुपदेशक किंवा मानसिक आरोग्यतज्ज्ञांची मदत घेण्यासाठी तिला प्रोत्साहित केले पाहिजे. सरकारने मानसिक आरोग्य सेवा अधिक सुलभ आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याबरोबरच ग्रामीण भागातही समुपदेशनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

शेतकरी, विद्यार्थी, कामगार, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अशा विविध घटकांसाठी स्थानिक पातळीवर मदतव्यवस्था मजबूत झाली पाहिजे. माध्यमांनीही आत्महत्यांच्या बातम्यांचे वार्तांकन करताना संवेदनशीलता आणि जबाबदारी पाळणे आवश्यक आहे.

आत्महत्या रोखणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही; ती कुटुंब, शैक्षणिक संस्था, समाज आणि प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आकडेवारी कमी करण्याबरोबरच त्यामागची कारणे कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

माणसांमधील संवाद, आपलेपणा आणि आधार वाढला तर अनेक संकटांना सामोरे जाण्याची ताकद निर्माण होऊ शकते. कोणत्याही व्यक्तीला तिच्या अडचणींमध्ये एकटे पडू न देणे, हाच आत्महत्या प्रतिबंधाचा खरा सामाजिक मार्ग आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# अधिस्वीकृती समित्यांच्या पुनर्रचनेपूर्वी सर्व क्रियाशील पत्रकार संघटनांकडून अर्ज मागवा

## नव्या पात्र संघटनांना समान संधी देऊनच राज्य व नऊ विभागीय समित्या गठित करा; प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रचे शासनाला निवेदन

**मुंबई | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील पत्रकार अधिस्वीकृती व्यवस्थेतील राज्य अधिस्वीकृती समिती आणि नऊ विभागीय अधिस्वीकृती समित्यांच्या पुनर्रचनेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. समित्यांचा कार्यकाळ, पत्रकार-संपादक संघटनांचे प्रतिनिधित्व, संघटनांची वैधानिक पात्रता, प्रत्यक्ष कार्यरत स्थिती आणि नव्या समित्यांच्या गठनाची प्रक्रिया याबाबत प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रने शासनाकडे सविस्तर भूमिका मांडली आहे. सर्व पात्र आणि क्रियाशील पत्रकार-संपादक संघटनांना समान संधी देऊनच नव्या समित्या गठित कराव्यात, तसेच ४ सप्टेंबर २०२६ रोजी देण्यात आलेल्या मुदतवाढीच्या कायदेशीर आधाराची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रने ७ सप्टेंबर २०२६ रोजी शासनाकडे सादर केलेल्या निवेदनात, नव्या समित्यांच्या गठनापूर्वी राज्यातील सर्व कायदेशीररीत्या नोंदणीकृत, क्रियाशील आणि पात्र पत्रकार-संपादक संघटनांकडून अर्ज मागवावेत, अशी प्रमुख मागणी केली आहे. केवळ यापूर्वीच्या समित्यांमध्ये प्रतिनिधित्व असलेल्या संघटनांचाच विचार न करता, २०२३ नंतर अस्तित्वात आलेल्या अथवा नव्याने पात्र ठरलेल्या संघटनांनाही प्रतिनिधित्वाची संधी मिळावी, अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

**११ जुलै २०२३ रोजी तीन वर्षांसाठी समित्या गठित**

प्रेस कौन्सिलच्या निवेदनानुसार, ११ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्य अधिस्वीकृती समिती आणि नऊ विभागीय अधिस्वीकृती समित्या तीन वर्षांच्या कालावधीसाठी गठित करण्यात आल्या होत्या. या समित्यांचा निर्धारित कार्यकाळ १० जुलै २०२६ रोजी पूर्ण झाला.

पत्रकारांकडून अधिस्वीकृतीसाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी, पात्रता व निकषांची तपासणी, संबंधित कागदपत्रांचा विचार आणि अधिस्वीकृती प्रक्रियेशी संबंधित शिफारसी यामध्ये या समित्यांची महत्त्वाची भूमिका असल्याने त्यांच्या रचनेचा आणि कार्यकाळाचा प्रश्न पत्रकारिता क्षेत्रासाठी महत्त्वाचा आहे.

**४ सप्टेंबरच्या मुदतवाढीवर कायदेशीर प्रश्न**

कार्यकाळ १० जुलै रोजी संपल्यानंतर ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्य व नऊ विभागीय अधिस्वीकृती समित्यांना आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आल्याचा उल्लेख प्रेस कौन्सिलने निवेदनात केला आहे.

मात्र, कार्यकाळ संपल्यानंतर त्याच समित्यांना पुढे सुरू ठेवण्यासाठी किंवा त्यांच्या कार्यकाळाला मुदतवाढ देण्यासाठी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व माध्यम अधिस्वीकृती नियमावली, २००७ मध्ये स्पष्ट कायदेशीर अथवा नियमाधारित तरतूद आहे का, याची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मुदतवाढ देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकारक्षेत्र, लागू नियमांतील तरतुदी, शासनस्तरावर झालेली प्रशासकीय प्रक्रिया आणि संबंधित अभिलेख यांची तपासणी करूनच या निर्णयाबाबत पुढील भूमिका निश्चित करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**मुदतवाढीपूर्वीच शासनाला इशारा**

विशेष म्हणजे, समित्यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच प्रेस कौन्सिलने शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले होते. ९ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या निवेदनातून विद्यमान समित्यांना मुदतवाढ देऊ नये, अशी मागणी करण्यात आली होती.

त्यानंतर २१ ऑगस्ट २०२६ रोजी पुन्हा सविस्तर निवेदन देऊन मुदत संपलेल्या समित्यांऐवजी नवीन राज्य व विभागीय अधिस्वीकृती समित्या गठित कराव्यात आणि पात्र पत्रकार-संपादक संघटनांना समान संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. मात्र, त्यानंतर ४ सप्टेंबरला मुदतवाढीचा शासन निर्णय जारी झाल्याने ७ सप्टेंबरला पुन्हा शासनाकडे निवेदन देऊन या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**'सर्व संघटनांना समान संधी द्या'**

नव्या समित्यांच्या गठनासाठी शासनाने सर्व पात्र संघटनांकडून अर्ज मागविण्यासाठी निश्चित कालावधी जाहीर करावा. प्रत्येक संघटनेला आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची संधी देऊन अर्जांची समान आणि वस्तुनिष्ठ निकषांवर छाननी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

विशेषतः २०२३ मध्ये समित्या गठित झाल्यानंतर अस्तित्वात आलेल्या किंवा अधिक सक्रिय झालेल्या पात्र पत्रकार-संपादक संघटनांना केवळ पूर्वी प्रतिनिधित्व नव्हते म्हणून प्रक्रियेपासून दूर ठेवू नये, अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

**संघटनांची वैधानिक पात्रता तपासण्याची मागणी**

समित्यांमध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्या किंवा प्रतिनिधित्वासाठी अर्ज करणाऱ्या संघटनांची कायदेशीर नोंदणी, वर्तमान वैधानिक स्थिती, नोंदणीची वैधता, नूतनीकरणाची कागदपत्रे, लेखापरीक्षण अहवाल, आर्थिक अभिलेख, पदाधिकाऱ्यांची माहिती, कार्यकारिणीची रचना, सदस्यसंख्या आणि प्रत्यक्ष कार्यरत स्वरूप तपासण्यात यावे, अशी मागणी आहे.

संघटना प्रत्यक्षात कार्यरत आहे का, तिची सदस्यसंख्या पडताळता येते का, ती पत्रकार व संपादकांचे प्रत्यक्ष प्रतिनिधित्व करते का आणि पत्रकारिता क्षेत्रातील तिच्या कामाची नोंद उपलब्ध आहे का, याचाही वस्तुनिष्ठ विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**सर्वांसाठी समान पात्रता निकष निश्चित करा**

संघटनांची पडताळणी करताना प्रत्येकासाठी समान आणि पूर्वनिश्चित निकष असावेत, असा आग्रह प्रेस कौन्सिलने धरला आहे. नोंदणी प्रमाणपत्र, वैधानिक कागदपत्रे, सदस्यसंख्या, कार्यालयीन व कार्यकारी रचना, लेखापरीक्षणाशी संबंधित कागदपत्रे आणि संघटनेच्या प्रत्यक्ष कामकाजाचा पुरावा या बाबींचा विचार करून पात्रता निश्चित करावी, अशी मागणी आहे. कागदपत्रांमध्ये काही त्रुटी अथवा स्पष्टीकरणाची आवश्यकता असल्यास संबंधित संघटनेला अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्याची वाजवी संधी देण्यात यावी, असेही निवेदनात नमूद आहे. नियमावलीत सुधारणा प्रलंबित; मग नव्या समित्यांची घाई कशासाठी? अधिस्वीकृती समित्यांच्या गठनासाठी लागू असलेल्या नियमावलीत सुधारणा (पान २ वर)

# श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त अभिवादन

**जालना - प्रतिनिधी**

महानुभाव पंथाचे संस्थापक व मानवतेचा संदेश देणारे श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात नायब तहसिलदार सुनिता वैष्णव यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसिलदार एस. आर. तायडे, सहायक सहकार अधिकारी पी. आर. मोताळे, सहायक महसुल अधिकारी रविंद्र मगरे, आर. आर. हेलगट, एस. जी. कुलकर्णी, अतुल केदार तसेच एस. ओ. खांडेभराड, एस.एस. भोकरे, सुनिल काळुंके आदी कर्मचारी उपस्थित होते.

# शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यस्तरीय लेख स्पर्धा

**मुंबई - प्रतिनिधी**

: महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनावर आपल्या विचारांचा ठसा उमटविणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू आहे. या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने ''शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे : राजकीय नेते, कलावंत आणि माणूस'' या विषयावर राज्यस्तरीय लेख स्पर्धेचे आयोजन केले आहे. बाळासाहेबांच्या विचारांचा, कार्याचा आणि महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसांच्या अस्मितेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा वेध राजकीय अभ्यासक, सामाजिक विचारवंत, साहित्यिक, पत्रकार, वृत्तपत्र लेखक, विद्यार्थी, अभ्यासक, गृहिणी, आणि साहित्यप्रेमींनी आपल्या लेखणीतून घ्यावा असे आवाहन रवींद्र मालुसरे आणि विजय ना कदम यांनी केले आहे. ही स्पर्धा राज्यस्तरीय असून, या स्पर्धेत दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सहभागी होऊ शकते. स्पर्धेसाठी आलेल्या लेखांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहे तसेच याच नावाने लेखांचे पुस्तक दसऱ्याला प्रकाशित करण्यात येणार आहे. स्पर्धेविषयी अधिक सविस्तर माहितीसाठी ग्रंथ निर्मिती आणि स्पर्धा प्रमुख सुनील कुवरे (पान २ वर)

# गंगुबाई रंगनाथ टेकाळे यांचे निधन

**जालना - प्रतिनिधी**



बदनापूर तालुक्यातील हिवरा दाभाडी येथील प्रतिष्ठीत नागरीक श्रीमती गंगुबाई रंगनाथ टेकाळे (वय १०३) यांचे शनिवार १२ सप्टेंबर रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात अवचितराव, गुलाबराव, प्रभाकर ही तीन मुले, हौसाबाई ही मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर हिवरा दाभाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, गावातील नागरीकांसह पंचक्रोषीतील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भगवान श्री चक्रधर स्वामी अवतार दिन सोहळा उत्साहात

## आमदार अर्जुनराव खोतकर यांची उपस्थिती

**जालना - प्रतिनिधी**

महानुभाव युवा प्रतिष्ठानच्या वतीने भगवान श्री चक्रधर स्वामी अवतार दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महानुभाव पंथाचे संस्थापक भगवान श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त आयोजित या सोहळ्यात भक्तीभाव, समर्पण, सेवा आणि नामस्मरणाचा जागर करण्यात आला. महानुभाव पंथाच्या परंपरा, संस्कृती आणि स्वामींच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. या कार्यक्रमासाठी शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर,



डॉ. श्री. बळीराम बागल, सर्जेराव शिंदे, विनीत साहानी, प्रताप शिंदे, राजू शिरसाठ, पत्रकार गुलाबराव पाटील, विजय शिंदे, विजय पाटील यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. तसेच महानुभाव पंथातील संत-महंत आणि अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी श्री सुदाम महाराज शास्त्री कोठी, श्री पाटील बुआ महाराज , श्री जसराज कल्याणकर, श्री कनवमुनी बिडकर, आदी संत उपस्थित होते. या वेळी महानुभाव पंथाचे संस्थापक ८०६ वा अवतार दिवस साजरा करताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी भगवान चक्रधर स्वामी यांच्या जयंती निमित्त सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. भगवान श्री चक्रधर स्वामी यांनी समाजाला भक्ती, मानवता, समता, सेवा आणि सदाचाराचा संदेश दिला. त्यांच्या (पान २ वर)

# रूख्मणबाई देवीदास बोराडे यांचे निधन

जालना : बदनापूर तालुक्यातील हिवरा दाभाडी येथील प्रतिष्ठीत नागरीक देवीदास बोराडे यांच्या पत्नी श्रीमती रूख्मणबाई देवीदास बोराडे (वय ६७) यांचे गुरूवार १० सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती देवीदास, मुले बाबासाहेब, शिवाजी, राजु, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर हिवरा दाभाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, गावातील नागरीकांसह पंचक्रोषीतील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विकसित मराठवाड्यासाठी विभागांनी ठोस कृती आराखडा द्यावा – जी. श्रीकांत

## 'विकसित मराठवाड्या'साठी विभागनिहाय विकासकामांचा आढावा

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

'विकसित महाराष्ट्र २०३०' अंतर्गत 'विकसित मराठवाडा' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील पूर्ण झालेली, सुरू असलेली व प्रलंबित कामांची अद्ययावत माहिती संक्षिप्त स्वरूपात सादर करावी. चांगली कामे, रखडलेले प्रकल्प व त्यावरील उपाययोजना यांची स्पष्ट माहिती द्यावी. निधी आवश्यक असलेले व निधीची आवश्यकता नसलेले प्रस्ताव स्वतंत्रपणे नमूद करावेत, अशा सूचना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

'विकसित महाराष्ट्र २०३०' अंतर्गत 'विकसित मराठवाडा' ही संकल्पना राबविण्या बाबतच्या कार्यवाहीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जीएसटीचे सह आयुक्त अभिजित राऊत, महावितरणचे सह व्यवस्थापकीय संचालक गजेंद्र बावने, अपर विभागीय आयुक्त रिता मेत्रेवार, सह आयुक्त मंजुषा मिसकर तसेच विविध शासकीय विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत मराठवाड्यातील विविध विभागांच्या सुरू असलेल्या, पूर्ण झालेल्या व प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला.

जी.श्रीकांत म्हणाले, प्रकल्पांच्या अंमलबजावणीत होणारा विलंब टाळण्यासाठी विभागांमध्ये प्रभावी समन्वय ठेवावा. एखाद्या प्रकल्पासाठी जमीन आवश्यक असल्यास त्याची स्पष्ट माहिती द्यावी. प्रलंबित बाबींचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, असे जी. श्रीकांत यांनी सांगितले. मराठवाड्याच्या विकासासाठी तयार करण्यात येणाऱ्या प्रस्तावांची सांगड महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याच्या उद्दिष्टाशी घालावी. विभागांनी केवळ निधीची मागणी करणारे प्रस्ताव न देता विकासाला चालना देणारे, परिणामकारक व दीर्घकालीन लाभ देणारे प्रस्ताव तयार करावेत. उपलब्ध साधनसंपत्तीचा प्रभावी वापर करून विकासाची गती वाढवावी, असे त्यांनी सांगितले.

१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत विविध प्रमाणपत्रांचे वाटप, सेवा शिबिरे व नागरिकांना थेट लाभ देणारे उपक्रम राबवावेत. नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभ, गतिमान व दर्जेदार पद्धतीने उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा. तरुण कर्मचाऱ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा प्रशासनाच्या कामकाजात उपयोग करावा, असेही जी. श्रीकांत यांनी सांगितले. शिपाई व कोतवालापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या कल्पनांना (पान २ वर)

# श्रीगणेशा आरोग्याचा उपक्रमातून राज्यभर भक्तांची मोफत आरोग्य तपासणी मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा पुढाकार

**मुंबई - प्रतिनिधी**

श्रीगणेशोत्सवात भक्तांच्या आरोग्याची काळजी घेत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने राज्यभर सुमारे २० हजार मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांपासून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत तसेच ग्रामीण भागापर्यंत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने सार्वजनिक आरोग्य विभाग सुमारे १० हजार सार्वजनिक गणेश मंडळे, शासकीय व निमशासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था आणि दात्यांच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदा राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली असून नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

डॉक्टर आपल्या दारी या उपक्रमात नागरिकांना त्यांच्या परिसरात आरोग्य तपासणीची सुविधा मिळावी आणि आजारांचे वेळेत निदान व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. तपासणीदरम्यान आरोग्यविषयक समस्या आढळल्यास संबंधितांना पुढील तपासणी व उपचारासाठी संदर्भित करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, शहरी आरोग्य आयुक्तालय, स्थानिक स्वराज्य संस्थांची आरोग्य यंत्रणा तसेच धर्मादाय रुग्णालयांतील डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात येणार आहे. तपासणीनंतर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या पात्र रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना तसेच इतर संबंधित शासकीय योजनांच्या माध्यमातून उपचाराचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे. गेल्यावर्षी दि. २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरदरम्यान आयोजित १२ हजार ६५५ आरोग्य शिबिरांमध्ये ७ लाख ४ हजार ७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी १८ हजार ८०० रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले होते. तसेच २३६ रक्तदान शिबिरांमध्ये १६ हजार ७९८ नागरिकांनी रक्तदान केले होते. या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर यंदा उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. या आजारांचा असणार समावेश हृदयरोग, किडनीविकार, कर्करोग, मधुमेह, संसर्गजन्य आजार, मेंदूचे गंभीर आजार, बालरोग यांसह विविध आजारांची प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. गरजेनुसार पुढील तपासणी व उपचारासाठी रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टर तसेच संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्यात (पान २ वर)

# शहरातील डॉ. राजेंद्र प्रसाद रोडवरील वाहतूक कोंडी आणि स्वच्छतेसाठी पोलीस अधीक्षक आणि महानगरपालिका आयुक्तांनी संयुक्त समिती स्थापन करावी – अँड. महेश धन्नावत

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील अत्यंत वर्दळीचा डॉ. राजेंद्र प्रसाद रोड हा गणेशोत्सव काळात पूर्णपणे जाम होतो, यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक आणि जालना महानगरपालिका आयुक्त यांनी एकत्र येऊन एक संयुक्त समिती स्थापन करावी, जेणेकरून वाहतूक आणि स्वच्छता दोन्ही व्यवस्थित राखली जाईल आणि पुढील वर्षाच्या व्यवस्थापनासाठी एक केस स्टडी तयार होईल, अशी मागणी श्री गणेश महासंघाचे कार्याध्यक्ष अँड. महेश धन्नावत यांनी केली आहे. अँड. धन्नावत म्हणाले की, पोलिसांनी आजपासूनच या रोडवरील १०० पेक्षा अधिक गणेश मंडळांशी समन्वय साधावा. प्रत्येक मंडळाने एक स्वयंसेवक द्यावा आणि त्याच्या जोडीला एक पोलीस कर्मचारी द्यावा, म्हणजे प्रत्येक मंडपाच्या ठिकाणी वाहतूक अडणार नाही. रस्ता मोकळा राहिल्यास महिला आणि लहान मुलांना या रस्त्यावरून सुरक्षितपणे ये-जा करता येईल आणि रुग्णवाहिकेलाही अडथळा येणार नाही. तसेच पर्यावरण मंत्री मा. पंकजाताई मुंडे यांच्या विभागाच्या दृष्टीनेही हे महत्वाचे आहे, कारण वाहतूक कोंडीत गाड्या तासन्तास उभ्या राहिल्याने मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन होते. वाहतूक सुरळीत राहिल्यास प्रदूषण कमी होईल. यासाठी पोलिसांनी हा रस्ता वन-वे घोषित करून सर्व गणेश मूर्तींच्या आगमनाची वेळ एका पॉईंटपासून दुसऱ्या पॉईंटपर्यंत समन्वय साधून ठरवावी. सर्वात महत्वाचे म्हणजे हैदराबादच्या धर्तीवर जालन्यातही गणेश मूर्तींच्या उंचीवर निर्बंध आणावे. हैदराबादमध्ये इलेक्ट्रिक वायरची उंची २२ फूट आणि वाहनाची उंची ४ फूट विचारात घेऊन गणेश मूर्तीची उंची १५ फूटापर्यंत मर्यादित ठेवली आहे. त्याच धर्तीवर जालन्यातही मूर्तीची (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.